# डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला

## अहवाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 9 मार्च 2023 रोजी सकाळी 11.00 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित हे होते. व्याख्यानमालीचे उद्‌घाटन डॉ. पंडित नलावडे (प्राचार्य, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते करण्यात आले. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प त्यांच्या हस्ते गुंफण्यात आले, त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या भारतीय लोकशाहीवर भाष्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य समाजवादातून स्वातंत्र्य,समता, बंधुत्व आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाजवादी लोकशाही स्थापन करण्याचा विचार मांडला. लोकशाहीमध्ये नियंत्रण आणि संतुलन याला फार महत्त्व असते. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सक्षम असा विरोधी पक्ष असला पाहिजे अशी भूमिका मांडली.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प (उपप्राचार्य, श्रीकिशन मोरे माणिकचंद पहाडे लॉ महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर) यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संविधानसभेतील प्रवास हा अभूतपूर्व ते अद्‌भुतपूर्व असा राहिलेला आहे. मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी संपूर्ण भारतीय राज्यघटनेचा संरचनात्मक आराखडा बनवून जे संविधान बनवले, त्यामुळेच आजचा हा अखंड भारत आणि या देशाची लोकशाही प्रवाहित, गतिमान आणि स्थिर झालेली दिसून येते. संविधान सभेतील बाबासाहेबांचे योगदान हे वादातीत आणि मध्यवर्ती राहिलेले असल्याने त्यांना भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणतात असे प्रा. श्रीकिशन मोरे यांनी आपले मत मांडले.

यावेळी महाविद्यालयातील 21 प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि 73 विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सहभाग होता. कार्यक्रमाचा प्रारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाला.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय डॉ.गजानन गजभिये यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एकनाथ खरात यांनी केले,तर उपस्थितीतांचे आभार डॉ. प्रविण चव्हाण यांनी केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

डॉ. जी.आर.गजभिये — प्राचार्य

राज्यशास्त्र विभाग प्रमुख



डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना मान्यवर



व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना प्राचार्य डॉ. पंडित नलावडे सर



व्याख्यानमालेचे  दुसरे पुष्प गुंफताना प्रा. श्रीकिशन मोरे सर



अध्यक्षीय समारोप करताना  प्राचार्य डॉ. अशोक पंडित सर

सकाळ छत्रपती संभाजीनगर
छत्रपती संभाजीनगर, शनिवार, ११ मार्च २०२३
TODAY

# चव्हाण महाविद्यालयामध्ये आंबेडकर व्याख्यानमाला

सिल्लोड, ता. १० : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला नुकतीच झाली. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानमालेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांच्या हस्ते झाले.



सिल्लोड : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयामध्ये व्याख्यानमाला झाली. यावेळी प्रमुख मान्यवर.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांची प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थिती होती. व्याख्यानमालेचे प्रथमपुष्प प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार' या विषयावर गुंफले. माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे प्रा. श्रीकिशन मोरे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. कार्यक्रमाच्या सुरवातीस राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. जी. आर. गजभिये यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एकनाथ खरात यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रवीण चव्हाण यांनी आभार मानले.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला संपन्न

**सिल्लोड/(प्रतिनिधी)-**

सिल्लोड शहरातील यशवंतराव चव्हाण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकराव पंडित हे होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. पंडित नलावडे प्राचार्य पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय यांनी प्रथम पुष्प 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार' या विषयावर गुंफले . यावेळी भाष्य



करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही संसदीय व्यवस्थेचा स्वीकार करण्यास भाग पाडले असे प्रतिपादन केले.

प्रा.श्रीकिशन मोरे उपप्राचार्य माणिकचंद पहाडिया लॉ महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. यावेळी त्यांनी असे स्पष्ट केले की, लोकशाही व बंधुभाव हाच केवळ व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये कोणताही रक्तपात न करता क्रांती घडवून आणू शकतो. डॉ.बाबासाहेबांनी जे योगदान संविधान निर्मितीमध्ये दिले त्यामुळे त्यांना आपण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी.आर. गजभिये यांनी प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एकनाथ खरात यांनी सूत्रसंचालन केले.

अध्यक्षीय समारोप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुकरण करून स्वतःचा विकास करून घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार डॉ. प्रवीण चव्हाण यांनी मानले. याप्रसंगी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

Dainik Samptra Date -12/03/2023

# सिल्लोडला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत मान्यवरांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी | सिल्लोड

शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (दिनांक ९) मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य अशोक पंडित होते. उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांच्या हस्ते झाले. व्याख्यानमालीचे प्रथम पुष्प प्राचार्य नलावडे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार' या विषयावर गुंफले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही संसदीय व्यवस्थेचा स्वीकार करण्यास भाग पाडले, असे प्रतिपादन केले. माणिकचंद पहाडिया विधी महाविद्यालयाचे उपप्राचार्य किशन मोरे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. त्यांनी असे स्पष्ट केले की, लोकशाही व बंधुभाव हाच केवळ व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये कोणताही रक्तपात न करता क्रांती घडवून आणू शकतो. डॉ. बाबासाहेबांनी जे योगदान संविधान निर्मितीमध्ये दिले. त्यामुळे त्यांना आपण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. जी. आर. गजभिये यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एकनाथ खरात यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुकरण करून स्वतःचा विकास करून घ्यावा असे आवाहन केले. आभार डॉ. प्रवीण चव्हाण यांनी मानले.

Dainik Divya Marathi Date-13/03/2023

मराठवाडा साथी

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला



■ यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ.पंडीत नलावडे, डॉ अशोक पंडीत,

**मराठवाडा साथी न्यूज**

सिल्लोड । शहरातील यशवंतराव चव्हाण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित हे होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती संभाजी नगर येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांच्या हस्ते झाले.

व्याख्यानमालीचे प्रथम पुष्प प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार' या विषयावर गुंफले . यावेळी भाष्य करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही संसदीय व्यवस्थेचा स्वीकार करण्यास भाग पाडले असे प्रतिपादन केले. प्रा.श्नीकिशन मोरे उपप्राचार्य माणिकचंद पहाडिया लॉ महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. जी.आर. गजभिये यांनी प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एकनाथ खरात यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्षीय समारोप्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक पंडित यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे अनुकरण करून स्वतःचा विकास करून घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार डॉ. प्रवीण चव्हाण यांनी मानले. याप्रसंगी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Chhatrapati sambhajinagar Edition
Mar 13, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com